ePaper
वर्ष - 9 | UDYAM-MH-26-0158827

# महाईन्यूज™

WWW.MAHAENEWS.COM | बुधवार, दि. 13 मे 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## तमिळनाडूतील राजकीय घडामोडींचा फायदा भाजपालाच; एनडीएची ताकद वाढणार





पान 3 वरुन...

ईएसआय रुग्णालयात कामगारांची हेळसांड

## देशात एकाच दिवशी एकाच पेपरवर परीक्षा धोकादायक

# NEET परीक्षा प्रक्रिया वादाच्या भोवऱ्यात!

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**देशातील सर्वात मोठी वैद्यकीय प्रवेश परीक्षा NEET UG पुन्हा एकदा पेपर लीक वादात सापडली आहे. 2024 नंतर आता 2026 मध्येही परीक्षा रद्द करण्याची वेळ आली आणि संपूर्ण प्रकरणाची चौकशी CBI कडे सोपवण्यात आली आहे. 3 मे रोजी झालेल्या या परीक्षेत तब्बल 24 लाख विद्यार्थी सहभागी झाले होते.**

यामुळे आता एक मोठा प्रश्न उपस्थित होत आहे. NEET चा पेपर पुन्हा पुन्हा कसा लीक होतो, पण JEE MAIN सारख्या मोठ्या परीक्षांमध्ये असे प्रकार फार कमी का दिसतात? शिक्षण तज्ज्ञांच्या मते, यामागे सर्वात मोठं कारण म्हणजे दोन्ही परीक्षांच्या पद्धतीत आणि व्यवस्थापनात असलेला मूलभूत फरक.



### ऑफलाइन पद्धतीमुळे धोका वाढतो...

तज्ज्ञांच्या मते, NEET परीक्षा अजूनही पारंपरिक पेन-पेपर (OMR) पद्धतीने घेतली जाते. यासाठी लाखो प्रश्नपत्रिका छापून देशभर पोहोचवाव्या लागतात. प्रिंटिंग प्रेस, वाहतूक, बँक लॉकर आणि परीक्षा केंद्र या अनेक टप्प्यांमधून प्रश्नपत्रिका जात असल्यामुळे गळतीचा धोका वाढतो. याउलट JEE MAIN ही पूर्णपणे कॉम्प्युटर बेस्ड टेस्ट (CBT) आहे. प्रश्नपत्रिका एन्क्रिप्टेड सर्व्हरवर सुरक्षित ठेवली जाते आणि परीक्षा सुरू होण्याच्या काही मिनिटांपूर्वीच ती उघडली जाते, त्यामुळे लीक होण्याची शक्यता अत्यंत कमी असते.

### परीक्षा केंद्रांमध्येही तफावत...

NEET साठी देशभरात सुमारे 4,700 ते 5,000 परीक्षा केंद्रे तयार केली जातात. अनेक शाळा व महाविद्यालयांचा समावेश असल्यामुळे सर्वत्र एकसारखी सुरक्षा राखणे कठीण ठरते. तर JEE MAIN मर्यादित आणि डिजिटल सुविधा असलेल्या केंद्रांवर घेतली जाते, जिथे CCTV, बायोमेट्रिक तपासणी आणि नेटवर्क मॉनिटरिंगसारखी कडक व्यवस्था असते.

### एकाच दिवशी परीक्षा; परिणाम संपूर्ण देशावर





NEET परीक्षा देशभरात एकाच दिवशी आणि एकाच प्रश्नपत्रिकेसह घेतली जाते. त्यामुळे एखाद्या ठिकाणी पेपर लीक झाला, तर त्याचा परिणाम संपूर्ण देशातील विद्यार्थ्यांवर होतो. तर JEE MAIN अनेक दिवस आणि विविध शिफ्टमध्ये घेतली जाते. प्रत्येक शिफ्टमध्ये वेगवेगळे प्रश्न असल्यामुळे एका केंद्रावरील गडबड संपूर्ण परीक्षेला प्रभावित करत नाही.

### पॅटर्न बदलाची शक्यता

सततच्या वादांनंतर NEET परीक्षाही भविष्यात ऑनलाइन किंवा हायब्रिड पद्धतीने घेण्याबाबत चर्चा सुरू झाली आहे. तज्ज्ञांच्या मते, डिजिटल प्रणालीमुळे पेपर लीकची शक्यता मोठ्या प्रमाणात कमी होऊ शकते. मात्र, ग्रामीण भागातील इंटरनेट सुविधा, संगणकांची उपलब्धता आणि मोठ्या प्रमाणावर परीक्षा व्यवस्थापन ही मोठी आव्हाने असल्याचेही स्पष्ट करण्यात आले आहे. एकूणच, NEET अजूनही पारंपरिक ऑफलाइन पद्धतीवर अवलंबून असल्यामुळे गळतीचा धोका अधिक असून, JEE MAIN मधील डिजिटल सुरक्षा हीच त्याची मोठी ताकद ठरत असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे.

### 'गेस पेपर'मुळे वाद तीव्र





NEET UG 2026 मधील वाद अधिक तीव्र झाला, जेव्हा सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या कथित 'गेस पेपर'मधील 100 हून अधिक प्रश्न प्रत्यक्ष परीक्षेशी जुळल्याचा दावा करण्यात आला. यामुळे परीक्षेच्या पारदर्शकतेवर मोठा प्रश्न उपस्थित झाला. यानंतर NATIONAL TESTING AGENCY ने परीक्षा रद्द करण्याचा निर्णय घेतला. परिणामी, लाखो विद्यार्थ्यांना पुन्हा परीक्षा द्यावी लागणार आहे.

# मेट्रो प्रशासनाचा 'रॅपिडो' प्लॅन फसला

## रामवाडी मेट्रो स्टेशनवर 'रॅपिडो' स्टँडला रिक्षाचालकांचा तीव्र विरोध

**महाईन्यूज | पुणे**

**रामवाडी मेट्रो स्टेशनपासून प्रवाशांना शेवटच्या टप्प्यापर्यंत प्रवास सुलभ व्हावा, यासाठी महामेट्रोने प्रस्तावित केलेला 'रॅपिडो' रिक्षा स्टँड वादाच्या भोवऱ्यात सापडला आहे. स्थानिक रिक्षाचालकांनी या उपक्रमाला बेकायदेशीर ठरवत जोरदार विरोध दर्शवल्याने अखेर प्रशासनाला उद्घाटनाचा कार्यक्रम रद्द करावा लागला. प्रादेशिक परिवहन कार्यालयाची (आरटीओ) परवानगी नसताना खासगी कंपन्यांना पायघड्या कशा घातल्या जातात, असा सवाल आता उपस्थित होत आहे.**



सोमवारी (दि.११) रामवाडी मेट्रो स्टेशनवर रॅपिडो रिक्षा स्टँडचे उद्घाटन करण्याचे नियोजन महामेट्रोने केले होते. मात्र, 'बघतोय रिक्षावाला' संघटनेसह स्थानिक रिक्षाचालकांनी तिथे धाव घेत प्रशासनाला धारेवर धरले. "रॅपिडो कंपनीकडे पुणे शहर किंवा महाराष्ट्र राज्यात रिक्षा सेवा चालवण्याचा वैध परवाना आहे का?" असा प्रश्न विचारताच मेट्रोचे अधिकारी निरुत्तर झाले. या गोंधळामुळे उद्घाटनासाठी आलेले अधिकारी कार्यक्रम सोडून निघून गेले.

याबाबत 'बघतोय रिक्षावाला' संघटनेचे अध्यक्ष केशव क्षीरसागर म्हणाले की, "आरटीओची कोणतीही अधिकृत परवानगी नसताना मेट्रो प्रशासन रॅपिडो या बेकायदेशीर कंपनीशी करार करण्याचा घाट घालत आहे. मेट्रोची सरकारी जागा अशा कंपन्यांना व्यावसायिक वापरासाठी देण्याचे षडयंत्र रचले जात आहे. ज्या कंपनीवर राज्यात अनेक गुन्हे दाखल आहेत, तिला मेट्रो प्रशासन अभय का देत आहे? हजारो कोटींची उलाढाल असणाऱ्या कंपन्यांच्या प्रभावाखाली अधिकारी काम करत आहेत का, याची चौकशी झाली पाहिजे."

दरम्यान, मेट्रो परिसरात रॅपिडोची सेवा याआधीपासूनच सुरू असल्याचे निदर्शनास आले आहे. मात्र, अधिकृत स्टँडवरून आता रिक्षा संघटना आणि मेट्रो प्रशासन यांच्यात जुंपली असून, भविष्यात हा वाद अधिक चिघळण्याची शक्यता आहे.

दुसरीकडे, महामेट्रोचे अतिरिक्त महाव्यवस्थापक (जनसंपर्क) चंद्रशेखर तांबवेकर यांनी प्रशासनाची बाजू मांडली. ते म्हणाले, "आम्ही प्रवाशांच्या सुविधेला आणि 'लास्ट माईल कनेक्टिव्हिटी'ला प्राधान्य देत आहोत. हा केवळ रिक्षा स्टँड होता, बाईक टॅक्सी नाही. स्थानिक रिक्षाचालकांच्या विरोधामुळे आम्ही सध्या हा निर्णय थांबवला असला तरी प्रवाशांचा प्रवास सुखकर करणे हेच आमचे उद्दिष्ट आहे."

### प्रवाशांची पसंती ॲप आधारीत रिक्षांनाच

रिक्षाचालकांचा विरोध असला, तरी सर्वसामान्य प्रवासी मात्र ॲप-आधारित सेवेच्या बाजूने असल्याचे दिसते. दररोज प्रवास करणारे प्रवासी राजीव शास्त्री म्हणाले, "रॅपिडोचे दर इतर ॲप्स किंवा मीटर रिक्षापेक्षा निम्म्याने कमी आहेत. दोन किलोमीटरसाठी जिथे सामान्य रिक्षा ८० रुपये घेतात, तिथे रॅपिडोवर केवळ ४५ रुपये लागतात."

# स्वारगेट एसटी स्थानकात चोरट्यांचा सुळसुळाट; दोन महिलांचे दागिने लंपास

**महाईन्यूज | पुणे**

**स्वारगेट एसटी स्थानकाच्या आवारात वेगवेगळ्या घटनांत प्रवासी महिलांच्या गळ्यातील एक लाख ६९ हजार रुपयांचे दागिने चोरट्यांनी लांबविल्याची घटना घडली. या प्रकरणी चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. रविवारी (१० मे) सकाळी साडेआठच्या सुमारास प्रवासी महिलेच्या गळ्यातील एक लाख ४ हजार रुपयांचे दागिने चोरट्यांनी लांबविले.**




### दागिने सांभाळण्याचे आवाहन

'उन्हाळी सुट्टीत अनेकजण परगावी जातात. स्वारगेट, मुंबई-पुणे रस्त्यावरील वाकडेवाडी, तसेच पुणे स्टेशन परिसरातील एसटी स्थानकात प्रवाशांची गर्दी असते. दरवर्षी उन्हाळी सुट्टीत एसटी स्थानकाच्या आवारात महिलांचे दागिने चोरून नेण्याच्या घटना वाढतात. दागिने चोरीच्या घटनांच्या पार्श्वभूमीवर महिलांनी शक्यतो दागिन्यांचे प्रदर्शन करू नये. दागिने सांभाळावेत', असे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले आहे. स्वारगेट एसटी स्थानकाच्या आवारात प्रवासी तरुणीवर बलात्कार झाल्याची घटना घडली होती. त्यानंतर सुरक्षाविषयक उपाययोजनांमध्ये वाढ करण्यात आली होती. एसटी स्थानकाच्या आवारात सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहेत.

याबाबत एका महिलेने स्वारगेट पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार ३५ वर्षीय महिला धनकवडीतील आंबेगाव पठार भागात राहायला आहेत. त्या उन्हाळी सुट्टी असल्याने मुलांसोबत माहेरी निघाल्या होत्या. गर्दीत चोरट्यांनी त्यांच्या गळ्यातील दागिने लांबविले.



स्वारगेट एसटी स्थानकाच्या आवारात सोमवारी (११ मे) एका महिलेच्या गळ्यातील ६५ हजार रुपयांचे मंगळसूत्र चोरट्यांनी लांबविल्याची घटना घडली. याबाबत एका ५४ वर्षीय महिलेने फिर्याद दिली आहे. तक्रारदार महिला पिंपरी-चिंचवड परिसरातील चऱ्होली भागात राहायला आहेत. त्या गावी निघाल्या होत्या. गर्दीत चोरट्यांनी त्यांच्या गळ्यातील मंगळसूत्र लांबविले. पोलीस उपनिरीक्षक कोतकर तपास करत आहेत. स्वारगेट एसटी स्थानक परिसरात एका ज्येष्ठ नागरिकाच्या गळ्यातील सोनसाखळी लांबविण्याची घटना नुकतीच घडली होती.

# महापालिकेचा खर्च धोक्याच्या रेषेवर

## 35% मर्यादा ओलांडण्याची शक्यता, भरतीला ब्रेक लावण्याचा लेखा-वित्त विभागाचा सल्ला


**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**शासनाच्या निर्देशानुसार पिंपरी-चिंचवड महापालिकेचा आस्थापनेचा खर्च 35 टक्क्याच्या मर्यादित असणे बंधनकारक आहे. महापालिकेचा आस्थापना खर्च 34 टक्क्यापर्यंत पोहोचला आहे. दरवर्षी अधिकारी व कर्मचाऱ्यांची वेतनवाढ, महागाई भत्ता फरक, किमान वेतनामध्ये वाढ आदी बाबींमुळे आस्थापना खर्चात 10 टक्के वाढ होत आहे. त्यामुळे आस्थापना खर्चाची 35 टक्क्यांची मर्यादा ओलांडण्याची शक्यता आहे. त्याला वेळीच अटकाव न केल्यास अधिकारी व कर्मचाऱ्यांचे वेतनच डोईजड होण्याचा धोका निर्माण झाला आहे.**

महापालिकेचे क्षेत्रफळ 181 चौरस किलोमीटर इतके आहे. शहरात सर्वत्र टोलेजंग इमारती उभ्या राहत असून, लोकवस्ती दाट होत चालली आहे. लोकसंख्या 30 लाखांच्या पुढे गेली आहे. संपूर्ण शहरात नागरी सुविधा तसेच, सेवा पुरवण्यासाठी महापालिकेकडून उपलब्ध मनुष्यबळाद्वारे नागरी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी कसरत करावी लागत आहे. परिणामी, नोकर भरती करण्यासाठी सर्व बाजूने दबाव वाढत आहे.

मात्र, महापालिकेच्या तिजोरीच्या मर्यादेमुळे भरतीस हिरवा कंदील दिला जात नसल्याचे चित्र आहे.

महापालिकेत सध्या 6 हजार 500 अधिकारी व कर्मचारी हे महापालिका आस्थापनेवर (कायमस्वरूपी) आहेत. त्यांचे वेतन, महागाई भत्ता व इतर भत्त्यावर महापालिकाचा मोठा खर्च होत आहे. तो खर्च 35 टक्क्यांपर्यंत पोहचला आहे. त्यात अत्यावश्यक विभागातील कर्मचाऱ्यांची भरती प्रक्रिया राबविल्यास तो अतिरिक्त खर्च वाढणार आहे. त्यामुळे अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या वेतनाचा भार महापालिकेवर वाढत असल्याचे आकडेवारीवरून स्पष्ट होत आहे. श्रीमंत महापालिकेला हा आर्थिक भार पेलवण्या- पलीकडे जात असल्याचे दिसत आहे. तो खर्च मर्यादित करण्यासाठी तातडीने उपाययोजना करण्याचा सल्ला लेखा व वित्त विभागाने आयुक्तांना दिला आहे. त्यादृष्टीने पावले उचलण्याकडे प्रशासनाकडून दुर्लक्ष झाल्याचे दिसत आहे. त्यामुळे महापालिकेची आर्थिक स्थिती डबघाईस येण्याचा धोका वाढला आहे.




### आस्थापना खर्च मर्यादित ठेवण्यासाठी भरती न करण्याचा सल्ला

आस्थापना खर्च मर्यादित ठेवण्यासाठी आस्थापनेवरील अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या वेतनाचा खर्च कमी करावा लागणार आहे. त्यासाठी आस्थापना खर्चावर नियंत्रण ठेवण्यासाठी उपाययोजना करणे अत्यंत आवश्यक आहे. त्यासाठी महापालिका आकृतीबंधाच्या मर्यादित स्थायी व अस्थायी कर्मचारी भरती किंवा बाह्यस्त्रोताद्वारे (आऊटसोर्स) कर्मचारी नेमणूक प्रक्रिया राबविणे अत्यंत आवश्यक आहे. सामान्य प्रशासन किंवा अन्य विभागांमार्फत आकृतीबंधाच्या मर्यादेबाहेर कोणताही स्थायी व अस्थायी कर्मचाऱ्यांची भरती किंवा बाह्यस्त्रोताद्वारे कर्मचारी नेमणूक करण्यावर बंधन घालणे आवश्यक आहे. भरतीप्रक्रिया राबविण्यात येऊ नये. त्या दृष्टीने गांभीर्याने पावले उचलणे आवश्यक असल्याचा सल्ला लेखा व वित्त विभागाकडून आयुक्तांना देण्यात आला आहे.

### आऊटसोर्सिंगद्वारे मनुष्यबळ नेमण्यावर भर...

महापालिकेच्या अनेक विभागांत मनुष्यबळाची कमतरता आहे. निवृत्ती तसेच, स्वेच्छानिवृत्तीनंतर त्या जागेवर नोकर भरती केली जात नसल्याचे दिसत आहे. त्यामुळे मोठ्या प्रमाणात मनुष्यबळाची कमतरता असल्याचे अधिकाऱ्यांकडून सांगण्यात येत आहे. महापालिकेच्या वैद्यकीय, आरोग्य, सुरक्षा, पाणीपुरवठा, कर संकलन, समाज विकास, शिक्षण, उद्यान आदी विभागांकडून कंत्राटी पद्धतीने कर्मचारी भरती केली जात असल्याचे दिसत आहे. मात्र, वर्ग ड मधील कर्मचाऱ्यांची कंत्राटी पद्धतीने भरती न करता आस्थापनेवर केली जावी, अशी मागणी केली जात आहे.

# ईएसआय रुग्णालयात कामगारांची हेळसांड; उपचारांऐवजी त्रासच जास्त

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**खासगी रुग्णालयातील महागड्या उपचारांऐवजी ईएसआय रुग्णालय कामगारांसाठी सोयीचे आहे. पिंपरी-चिंचवड शहरात सुमारे 16 लाख 28 हजार कामगार आहेत. त्यातील केवळ 6 लाख 50 हजार कामगारांची ईएसआय नोंदणी झाली आहे. त्यांच्या पगारातून दरमहा ठराविक रक्कम ही आरोग्य सुविधेसाठी कपात केली जाते; मात्र दुसरीकडे उपचाराची वेळ आल्यास या कामगारांना वणवण करावी लागत आहे.**




कर्मचारी राज्य विमा (ईएसआय) ही कामगार आणि त्यांच्या कुटुंबासाठी एक सामाजिक सुरक्षा योजना आहे. शहरातील प्रत्येक कामगारांना तातडीची वैद्यकीय मदत मिळावी, यासाठी चिंचवड मोहननगर येथे कामगार राज्य विमा महामंडळाचे (ई.एस. आय.सी) एक रुग्णालय आहे. सध्या शहरात सुमारे साडे 6 लाख 50 हजार कामगारांची नोंद आहे. पिंपरी-चिंचवड आणि चाकण, तळेगाव, राजगुरुनगर या एमआयडीसी परिसरामधील कंपन्यांमधील कामगारांचा समावेश आहे.

अनेक कंपन्यांमधील कामगारांच्या वेतनातून ईएसआयचे योगदान नियमितपणे कापले जाते. नियमानुसार, कामगारांना या बदल्यात मोफत आणि उत्तम दर्जाची आरोग्य सुविधा मिळणे अपेक्षित आहे. परंतु, प्रत्यक्षात रुग्णालयात गेल्यावर लांबच लांब रांगा, कागदपत्रांची अडवणूक आणि तांत्रिक अडचणींचे कारण देऊन रुग्णांना ताटकळत ठेवले जाते. डॉक्टर्स व्यवस्थित बोलत नाही. तपासणी करत नाही. उपचारात टोलवाटोलवी केली जाते. कंत्राटी कामगारांना तर या सुविधांचा लाभ घेण्यासाठी अनेक अडचणींचा सामना करावा लागतो.

### डॉक्टरही वेळेवर उपलब्ध नाहीत

विमा योजनेच्या पॅनेलवरील रुग्णालयांची संख्या कमी आहे. कधी डॉक्टर्स उपलब्ध नसतात, तर कधी महिनोंमहिने अपॉईंटमेंट मिळत नाही. त्यामुळे नाईलाजाने कामगार खासगी रुग्णालयात उपचार करून घ्यावे लागतात. विमा योजनेचा पॅनेलवर जे रुग्णालय आहेत, त्यात महिला, पुरुषांसाठी असलेले वॉर्ड नियमानुसार नाहीत. डॉक्टरही वेळेवर उपलब्ध नसतात. कामगारांची हेळसांड होत असल्याबद्दल कामगार नाराजी व्यक्त करतात आहे. ईएसआय रुग्णालयामध्ये दररोज शेकडो कामगार उपचारासाठी येतात. अनेक कामगारांनी तक्रार केली आहे की, रुग्णालयात औषधांचा तुटवडा आहे. गंभीर आजार असलेल्या रुग्णांनाही खासगी रुग्णालयात जाण्याचा सल्ला दिला जातो, ज्यामुळे गरीब कामगारांना स्वतःच्या खिशातून पैसे खर्च करावे लागत आहेत.

> काही रुग्णांचे कागदपत्रे पूर्ण नसतात. तर कधी इथे शक्य नसल्यास संबंधित रुग्णास भागीदारी (टायप) रुग्णालयात पाठवावे लागतात. तेव्हा संबंधित रुग्णाचे नाव, जन्मतारखा सर्व बरोबर असणे गरजेचे आहे. त्यामध्ये काही चूक आढळल्यास संबंधित रुग्णालयाकडून त्या रुग्णास दाखल करून घेतले जात नाही. त्या वेळी संबंधित रुग्णास उपचारासाठी अडचण येते.
>
> **- वर्षा सुपे, वैद्यकीय अधीक्षक ईएसआय रुग्णालय.**



## भूमिका

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची जनतेशी संवाद साधण्याची शैली नेहमीच चर्चेत राहिली आहे. कठीण आर्थिक विषयही सामान्य माणसाला सहज समजतील अशा भाषेत मांडण्याचे कौशल्य त्यांच्याकडे आहे. अलीकडील भाषणात त्यांनी देशातील आर्थिक परिस्थिती आणि जागतिक संकटांच्या पार्श्वभूमीवर नागरिकांना काटकसरीचा संदेश दिला.**

# अदृश्य अर्थदृष्टी : काटकसर, त्याग आणि अर्थकारण



इंधनाची बचत करा, घरून काम करा, सार्वजनिक वाहतुकीचा वापर वाढवा, सोनेखरेदी टाळा, परदेशातील खर्च कमी करा आणि नैसर्गिक शेतीकडे वळा, अशा सूचना त्यांनी दिल्या.

या आवाहनामागे देशाच्या अर्थव्यवस्थेवरील वाढत्या ताणाची जाणीव स्पष्ट दिसते. पश्चिम आशियातील युद्धसंकटामुळे इंधनाच्या किंमती वाढल्या आहेत. आयात महाग होत असताना रुपयाची घसरण, वाढती महागाई, वाढलेली वित्तीय तूट आणि अनुदानाचा भार यामुळे आर्थिक आव्हाने तीव्र झाली आहेत. अशा परिस्थितीत सरकारने थेट आर्थिक आकडेवारी मांडण्याऐवजी जनतेला "राष्ट्रीय कर्तव्य" म्हणून काटकसरीचे आवाहन केले आहे. अर्थशास्त्रातील गुंतागुंतीच्या संकल्पना लोकांच्या दैनंदिन जीवनाशी जोडून सांगण्याची ही पद्धत प्रभावी ठरते.

मात्र या भूमिकेवर टीकाही होत आहे. विरोधकांच्या मते, आर्थिक धोरणातील त्रुटी आणि अपयश झाकण्यासाठी नागरिकांच्या त्यागाला देशभक्तीचे स्वरूप दिले जात आहे. सरकारने इंधनावरील कर कमी करून थेट दिलासा देण्याऐवजी वापरावर मर्यादा आणण्याचा सल्ला दिला आहे. त्यामुळे आर्थिक संकटाचा भार सामान्य नागरिकांवर टाकला जात असल्याची भावना निर्माण होते. विशेषतः मध्यमवर्ग, पगारदार आणि शेतकरी वर्गासाठी ही काटकसर अधिक कठीण ठरू शकते.

तरीही मोदी यांच्या मांडणीचे एक वैशिष्ट्य नाकारता येत नाही. ते अर्थशास्त्राला केवळ आकडेवारीपुरते मर्यादित ठेवत नाहीत, तर त्याला सामाजिक शिस्त आणि राष्ट्रीय जबाबदारीशी जोडतात. "बचत हेच राष्ट्रीय कर्तव्य" आणि "स्वदेशी व आत्मनिर्भरता" यांसारख्या संकल्पनांमधून ते लोकांमध्ये आर्थिक शिस्त निर्माण करण्याचा प्रयत्न करतात. संकटकाळात नागरिकांनी त्याग करणे आवश्यक असल्याचा संदेश ते सातत्याने देतात. परंतु कोणतीही अर्थव्यवस्था केवळ बचतीवर टिकत नाही. उत्पादन, गुंतवणूक, रोजगार आणि बाजारातील मागणी यांनाही चालना देणे आवश्यक असते.

जर सतत काटकसर आणि त्यागावर भर दिला गेला, तर बाजारातील मागणी कमी होऊन आर्थिक गती मंदावण्याचा धोका वाढू शकतो. "पाच ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्था" या महत्त्वाकांक्षी उद्दिष्टालाही त्याचा फटका बसू शकतो.एकूणच, मोदी यांच्या आर्थिक दृष्टिकोनात संवादकौशल्य आणि जनमानसावर प्रभाव टाकण्याची ताकद दिसते. मात्र आर्थिक समस्यांवर दीर्घकालीन उपाय शोधण्यासाठी केवळ भावनिक आवाहने पुरेशी नसतात. सरकारने जनतेकडून त्यागाची अपेक्षा ठेवताना प्रभावी आर्थिक धोरणे, रोजगारनिर्मिती आणि महागाई नियंत्रणासाठी ठोस पावले उचलणेही तेवढेच आवश्यक आहे.

## प्रासंगिक »

### पोपट

**एका श्रीमंत माणसाजवळ एक पोपट होता. त्या पोपटास त्याने एका मोठ्या व सुंदर पिंजऱ्यात ठेवले होते. तो त्याला चांगली फळे खायला घालीत असे. त्या पोपटाला तेथे सर्व सुखे अनुकूल होती.**

तरी ही तो मनात नेहमी झुरत असे. 'माझे जातभाई जसे मोकळेपणे या जंगलातून त्या जंगलात जातात अन् या फांदीवरून त्या फांदीवर उड्या मारतात. तसे मला करायला मिळाले तर किती बरे होईल.'

एके दिवशी चुकून पिंर्जयाचे दार उघडे राहिल्याने त्या पोपटाची इच्छा पूर्ण झाली. या पिंजऱ्यातून पोपट घाईने बाहेर पडून लांबच्या आंब्याच्या झाडावर जाऊन बसला. थोड्या वेळाने त्याला भूक लागली. तेव्हा इकडे तिकडे पाहू लागला. चमचमाट, ढगांचा आवाज होऊन पाऊस पडायला लागला. त्या बिचाऱ्या पोपटाचे फारच हाल झाले.

अशा गोष्टीची त्याला कधीच सवय नव्हती. शेवटी पावसात भिजून व थंडीने काकडून त्याचे तेथेच प्राण गेले. मरता मरता तो म्हणाला. 'मला जर पुन्हा त्या पिंजऱ्यात जाता आले, तर त्यातून बाहेर पडण्याची मी पुन्हा इच्छा कधीही करणार नाही.'

- तात्पर्य : **ठेविले अनंते तैसेची राहावे. चित्ती असो द्यावे समाधान.**

देश आर्थिक संकटाच्या छायेत उभा असताना नागरिकांनी काटकसरीने जगावे, असा संदेश पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिला. इंधन बचत करा, सार्वजनिक वाहतूक वापरा, घरून काम करा, सोनेखरेदी टाळा आणि अनावश्यक खर्च कमी करा.

# साधेपणाचा सल्ला आणि महागाईची झळ

या सूचनांमधून त्यांनी आर्थिक शिस्तीचे महत्त्व अधोरेखित केले. जागतिक परिस्थिती, वाढती महागाई आणि इंधनदरवाढ यामुळे देशावर आलेले आर्थिक दडपण कमी करण्यासाठी जनतेनेही योगदान द्यावे, हा त्यामागील उद्देश आहे.

काटकसर हा भारतीय संस्कृतीचा भागच मानला जातो. "बचत हीच कमाई" ही भावना अनेक पिढ्यांनी जोपासली आहे. त्यामुळे मोदी यांच्या सूचनांमध्ये काही नवीन नाही; मात्र त्यांनी त्या राष्ट्रीय कर्तव्याशी जोडल्या आहेत. नागरिकांनी परदेशी खर्च कमी करणे, तेलाचा वापर मर्यादित ठेवणे किंवा चैनीच्या गोष्टी टाळणे यामुळे विदेशी चलनाची बचत होऊ शकते, असे त्यांचे म्हणणे आहे. आर्थिक संकटात संयम आणि साधेपणा आवश्यक असतो, हा संदेश त्यांनी सोप्या भाषेत दिला.




मात्र या आवाहनाकडे केवळ गांभीर्यानेच नव्हे तर उपरोधानेही पाहिले जात आहे. सामान्य माणूस आधीच महागाई, बेरोजगारी आणि वाढत्या खर्चामुळे त्रस्त आहे. अशा परिस्थितीत त्याग, बचत आणि काटकसरीचे धडे देणे म्हणजे नागरिकांवरच आर्थिक ओझे टाकण्याचा प्रयत्न असल्याची टीका होते. "वर्क फ्रॉम होम", सार्वजनिक वाहतूक किंवा साधे जीवन या गोष्टी काहींसाठी व्यवहार्य असल्या, तरी सर्वच घटकांसाठी शक्य नाहीत.

या विषयातील उपरोध असा की, सामान्य माणूस आधीपासूनच मर्यादित साधनांत जीवन जगत आहे. अनेकांना परदेश प्रवास, सोनेखरेदी किंवा चैनीच्या वस्तू परवडतच नाहीत. त्यामुळे "त्याग करा" हा संदेश त्यांच्या वास्तवाशी विसंगत वाटतो. तरीही संकटाच्या काळात देशहितासाठी संयम आवश्यक असतो, हेही नाकारता येत नाही.

एकूणच, काटकसरीचा संदेश हा केवळ आर्थिक नाही तर सामाजिक मानसिकतेशी संबंधित आहे. मात्र त्याचवेळी सरकारनेही महागाई नियंत्रण, रोजगारनिर्मिती आणि सामान्य नागरिकांना दिलासा देणारी धोरणे राबवणे गरजेचे आहे. अन्यथा काटकसर ही सवय नसून मजबुरी बनण्याचा धोका वाढू शकतो.

## ।। अभंगवाणी ।।



वाळो जन मज म्हणोत शिंदळी ।  
परि हा वनमाळी न विसंबें ॥१॥

सांडूनि लौकिक जालियें उदास ।  
नाहीं भय आस जीवित्वाची ॥ध्रु.॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक.** (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गौरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# नीट २०२६ पेपरफुटीचे ‘नाशिक कनेक्शन’

## राजस्थान पोलिसांच्या विनंतीवरून इंदिरानगरमध्ये संशयिताला अटक!

**महाईन्यूज । नाशिक**

**पेपर फुटीच्या आरोपांमुळे देशातील तब्बल २२ लाख विद्यार्थ्यांनी ३ मे २०२६ रोजी दिलेली नीट २०२६ परीक्षा रद्द करण्यात आली. या पेपरफुटीचे केंद्र नाशिक असल्याचे सांगितले जात असताना मंगळवारी राजस्थान पोलिसांच्या विनंतीवरून नाशिक पोलिसांनी इंदिरानगर भागातून एकाला ताब्यात घेतले. आपली ओळख पटू नये म्हणून संशयिताने वेशभूषा बदललेली होती. केस कापलेले होते. संशयित मूळचा नाशिकचा असून तो भोपाळ येथील वैद्यकीय महाविद्यालयात एमबीबीएसचे शिक्षण घेत असल्याची माहिती समोर येत आहे.**



कथित पेपर फुटीमुळे नीट २०२६ परीक्षा रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. आता विद्यार्थ्यांना ही परीक्षा नव्याने परीक्षा द्यावी लागणार आहे. अनेक राज्यात पसरलेल्या पेपर फुटीच्या रॅकेटचे केंद्र नाशिक असल्याचे सांगितले जाते. या कथित पेपरफुटीचा तपास केंद्रीय अन्वेषण विभाग अर्थात सीबीआयने हाती घेतला आहे. ही पेपरफूट महाराष्ट्रातील नाशिक येथून सुरू झाल्याचे सांगितले जाते. नंतर व्हॉट्सअॅप ग्रुप आणि टेलिग्राम चॅनेलद्वारे इतरत्र पसरली. राज्यस्थानच्या विशेष कृती दलाला एक हस्तलिखीत अंदाजित प्रश्नपत्रिका अर्थात ‘गेज पेपर’ मिळाला होता. त्यातील अनेक प्रश्न मूळ परीक्षेतील प्रश्नांशी शब्दश: जुळत होते, असे सांगितले जाते.

प्रश्नपत्रिकेची एक छापील प्रत नाशिकहून हरियाणाला पाठविली गेली, जिथे तिच्या अनेक बनावट प्रती तयार करण्यात आल्या. त्यानंतर प्रत्येकी १० प्रती असलेले काही संच वेगवेगळे करून ते राजस्थान, तेलंगणा, आंध्र प्रदेश आणि जम्मू-काश्मीर आदी राज्यात समाजमाध्यमांवरून फॉरवर्ड केल्याचा संशय व्यक्त केला जातो.

राजस्थान पोलिसांकडे पथक नाशिकमध्ये येत आहे. संशयिताला त्यांच्या स्वाधीन केले जाईल, असे चव्हाण यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना सांगितले. दरम्यान, संशयित हा मूळचा नाशिक जिल्ह्यातील नांदगाव येथील आहे. भोपाळ येथे एमबीबीएसच्या तिसऱ्या वर्षात तो शिक्षण घेत असल्याची माहिती समोर आली. संशयित शैक्षणिक समुपदेशक म्हणून काम करीत असल्याचे सांगितले जाते.

### संशयिताने स्वताची वेशभूषा बदलली

नीट २०२६ परीक्षेच्या कथित पेपर फुटीशी नाशिकचे संबंध असल्याची बाब प्राथमिक चौकशीत समोर आली. राजस्थान पोलिसांनी संशयिताची माहिती नाशिक पोलिसांना देऊन त्याला पकडण्याची विनंती केली होती. या आधारे संशयिताला इंदिरानगर भागातून ताब्यात घेण्यात आल्याची माहिती वरिष्ठ पोलीस अधिकारी किरणकुमार चव्हाण यांनी दिली. संशयिताने स्वताची वेशभूषा बदलली होती. केस कापलेले होते.

# सातारा जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये पहिलीपासून इंग्रजीचा ‘सातारा पॅटर्न’

**महाईन्यूज । सातारा**

**इंग्रजी भाषेचे ज्ञान मिळावे म्हणून सातारा जिल्हा परिषदेच्या सर्वच शाळांत पहिलीपासून इंग्रजी शिकविण्याचा, तसेच ‘सीबीएससी’ पद्धतही काही शाळांत राबविण्याचा निर्णय शिक्षण समिती सभेत घेण्यात आला. त्यामुळे जिल्ह्यातील जिल्हा परिषद शाळेतील मुले आता भविष्यातील स्पर्धेशी समर्थपणे सामोरी जाण्यास तयार होणार आहेत.**



जिल्हा परिषदेत शुक्रवारी शिक्षण समितीची सभा सभापती तेजस्विनी कदम यांच्या अध्यक्षतेखाली झाली. या वेळी विविध निर्णय घेण्यात आले. सभेला प्राथमिक विभागाचे शिक्षणाधिकारी अनिस नायकवडी, समितीचे सदस्य अजित साळुंखे, विक्रम शिंगाडे, सूरज पाटील, स्वप्ना पाटील, मनीषा फडतरे, कविता ओंबळे आदींसह अधिकारी उपस्थित होते.

जिल्हा परिषदेत सत्ता स्थापन झाल्यानंतर शिक्षण समितीची पहिलीच सभा पार पडली. सुमारे तीन तासांहून अधिक काळ सभा चालली. त्यामध्ये विविध विषयांवर चर्चा झाली. तसेच अनेक ठराव घेण्यात आले. यामध्ये सध्या स्पर्धेचे युग आहे. ‘एआय’ला महत्त्व आले आहे. अशा वेळी जिल्हा परिषद शाळेतील मुलांना नवनवीन ज्ञान मिळावे. त्यांना इंग्रजी भाषा यावी, यासाठी प्रयत्न करण्याचा निर्णय झाला. याकरिता जिल्हा परिषदेच्या शाळेत पहिलीपासून इंग्रजी शिकविण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यामुळे पालकांचाही ओढा जिल्हा परिषद शाळेकडे वाढणार आहे.

### बोगस शाळांवर कारवाई

सातारा जिल्ह्यात जूनपासून नवीन शैक्षणिक वर्ष सुरू होत आहे. जिल्ह्यात अनेक शाळा बोगस आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांचे नुकसान होते. यासाठी १५ दिवसांत बोगस शाळांचा शोध घ्यावा, अशी सूचना करण्यात आली. त्यानंतर संबंधित बोगस शाळांवर कारवाई करण्यात येणार आहे, अशी माहितीही सभापती तेजस्विनी कदम यांनी दिली. शासनाच्या वतीने चौथी आणि सातवीच्या वर्गासाठी शिष्यवृत्ती परीक्षा घेतली जाते. यामध्ये सर्वाधिक मुले उत्तीर्ण होणाऱ्या शाळांना बक्षीस देण्यात येणार आहे. तसेच सर्वाधिक मुले उत्तीर्ण होणाऱ्या तालुक्यांचाही सन्मान करण्यात येणार असल्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

### फुले दाम्पत्याच्या नावाने पुरस्कार

जिल्ह्यातील अनुदानित शाळांनी विद्यार्थ्यांकडून फी घेऊ नये, असा ठराव सभेत झाला. त्याचबरोबर क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले आणि महात्मा जोतिबा फुले यांच्या नावाने त्यांच्या जयंतीदिवशी शिक्षकांना पुरस्कार देण्याचाही ठराव मंजूर करण्यात आला.

# मोदींचा अमृतकाळ आता विषकाळ झालाय

## NEET परीक्षा रद्द झाल्यानंतर राहुल गांधींचा सरकारवर हल्लाबोल!

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**वैद्यकीय अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी आवश्यक असणारी नीट परीक्षा रद्द झाल्याने देशभरातून पालक आणि विद्यार्थ्यांमध्ये तीव्र संताप व नाराजीचे वातावरण पाहायला मिळत आहे. विरोधकांकडून याप्रकरणी सरकारवर टीका होत आहे. लोकसभेचे विरोधी पक्षनेते आणि खासदार राहुल गांधी यांनी मोदी सरकारवर प्रहार करत पंतप्रधान नरेंद्र मोदींचा तथाकथित अमृतकाळ आता विषात रुपांतर होऊ लागल्याची टीका केली आहे.**





राहुल गांधी यांनी एक्स या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर याप्रकरणी पोस्ट करुन सरकारवर हल्लाबोल केला. "नीट परीक्षा रद्द झाली, २२ लाखांहून अधिक विद्यार्थ्यांचे परिश्रम, त्याग आणि स्वप्नं या भ्रष्ट भाजपा व्यवस्थेने चिरडून टाकली", असा आरोप राहुल गांधी यांनी केला. "लाखो विद्यार्थ्यांना पुन्हा एकदा तोच मानसिक ताण, आर्थिक ओढाताण आणि अनिश्चिततेचा सामना करावा लागेल. दरवेळी पेपर माफिया निसटून जातात आणि प्रामाणिक विद्यार्थ्यांना शिक्षा भोगावी लागते", असे राहुल गांधी यांनी एक्सवर केलेल्या पोस्टमध्ये म्हटले आहे.

"कोणाच्या वडिलांनी कर्ज घेतले, कोणाच्या मातेने आपले दागिने विकले, लाखो मुलांनी रात्रीचा दिवस करून अभ्यास केला. पण, त्या बदल्यात त्यांना मिळाले ते फक्त पेपर फुटी, सरकारी निष्काळजीपणा आणि शिक्षण क्षेत्रातील भ्रष्टाचार. हे केवळ अपयश नसून तरुणांच्या भविष्याशी केलेला अपराध आहे", असा शब्दात राहुल गांधी यांनी सरकारला धारेवर धरले. "विद्यार्थ्यांचे निशीब कष्टापेक्षा पैसा आणि वशिल्याने ठरवले जाणार असेल, तर शिक्षणाला काय अर्थ उरेल?", असा सवाल देखील गांधी यांनी उपस्थित केला. पंतप्रधानांचा तथाकथित 'अमृतकाळ' देशासाठी 'विषकाळ' बनला आहे, असे गांधींनी या पोस्टमध्ये म्हटले आहे.

### पेपरफुटीच्या आरोपानंतर नीट परीक्षा रद्द

पेपरफुटीच्या आरोपानंतर केंद्राने नीट परीक्षा -२०२६ रद्द केली. ०३ मे रोजी घेण्यात आलेली परीक्षा अचानक रद्द करण्यात आल्याने विद्यार्थी आणि पालकांकडून तीव्र संताप आणि नाराजी व्यक्त केली जात आहे. केंद्राने ही परीक्षा पुन्हा घेणार असल्याचे स्पष्ट केले आहे. परीक्षेची तारीख नंतर जाहीर करण्यात येईल असे स्पष्ट करण्यात आले. दरम्यान, नीट पेपरफुटी प्रकरणाचा सीबीआयच्या माध्यमातून तपास होणार असल्याचे सांगण्यात आले आहे. पेपरफुटीच्या आरोपानंतर एनटीएच्या नि:पक्षतेवर संशय घेण्यात आला. यामुळे ०३ मे रोजी घेण्यात आलेली परीक्षा पुन्हा घेतली जाणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

### २२.७९ लाख विद्यार्थींनी दिली होती परीक्षा

एमबीबीएस, बीडीएस आणि वैद्यकीय क्षेत्रातील इतर अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी भारतात नीट परीक्षा महत्वाची मानली जाते. देशातून लाखो विद्यार्थी दरवर्षी या परीक्षेची तयारी करत असतात. यावर्षी देशातील ५५१ शहरातील ५,४०० परीक्षा केंद्रांवर ०३ मे रोजी नीट लेखी परीक्षा पार पडली. या परीक्षेसाठी देशातून २२.७९ लाख विद्यार्थी बसले होते.




# मुख्यमंत्री विजय यांचा आध्यात्मिक सल्लागार रिकी राधन आता ओएसडी

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**द्रमुक आणि अण्णाद्रमुक यांचे वर्चस्व असलेल्या तमिळनाडूमध्ये अवघ्या दोन वर्षांपूर्वी उदय झालेल्या जोसेफ विजय यांच्या टीव्हीके पक्षाने घवघवीत यश मिळवले. विजय यांनी काँग्रेससह इतर पक्षांना बरोबर घेऊन सत्ता स्थापन केली. मुख्यमंत्री विजय यांनी पदभार स्वीकारल्यानंतर निर्णयांचा धडाका सुरु केला आहे. अशात विजय यांनी केलेल्या एका निवडीने सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे. विजय यांनी त्यांचे ज्योतिषी आणि आध्यात्मिक सल्लागार, रिकी राधन पंडित वेट्रिवेल यांची मुख्यमंत्र्यांचे विशेष कार्य अधिकारी (राजकीय) (ओएसडी) म्हणून नियुक्ती केली आहे. याबाबतचा सरकारी आदेश जारी करण्यात आला आहे.**





सी. जोसेफ विजय यांनी रविवारी तमिळनाडूचे मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली. शपथ घेतल्यानंतर दोनच दिवसात रिकी राधन पंडित वेट्रिवेल यांची ओएसडी (राजकीय) म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. सरकारी आदेशात मुख्यमंत्री जोसेफ विजय यांनी पदभार स्वीकारल्यापासूनच ही नियुक्ती ग्राह्य धरण्यात आल्याचे नमूद करण्यात आले आहे. विजय यांच्या टीव्हीके पक्षाला विधानसभेच्या निवडणुकीत १०७ जागांवर विजय मिळाला. विजय यांनी काँग्रेस, व्हीसीके यासह मुस्लिम लीग आणि इतर पक्षांना बरोबर घेऊन सत्ता स्थापनेचा प्रस्ताव राज्यपालांना दिला.

रिकी राधन पंडित वेट्रिवेल तमिळनाडूमध्ये ज्योतिषी आणि आध्यात्मिक सल्लागार म्हणून प्रसिद्ध आहेत. मुख्यमंत्री विजय यांच्या राजकीय प्रवासात पंडित वेट्रिवेल यांची महत्वपूर्ण भूमिका असल्याचे सांगितले जाते. विजय यांच्या पक्षाला मिळालेले भरघोस यशाचे भाकीत पंडित वेट्रिवल यांनी खूप पूर्वीच केले होते, असे येथील राजकीय विश्लेषक सांगतात. विजय यांचा रविवारी पार पडलेला शपथविधी दुपारी तीन वाजून ४५ मिनिटांनी होईल असे सुरुवातीला सांगण्यात आले होते. मात्र, शपथविधीची वेळ सकाळी दहा करण्यात आली, पंडित वेट्रिवेल यांनीच हा वेळेत बदल केला होता अशी माहिती समोर आली आहे.

### शुभेच्छा देण्यासाठी गाठले घर

विजय यांना सरकार स्थापन करण्यासाठी ११८ हा बहुमताचा आकडा गाठणे आवश्यक होते. पण, तीनवेळा राज्यपालांची भेट घेऊन देखील विजय यांना राज्यपालांकडे बहुमत दाखवता आले नाही. अखेर विजय यांनी राजकीय समीकरण जुळवून आणत राज्यपालांना संख्याबळ दाखवले. विधानसभेचा निकाल जाहीर झाल्यानंतर पंडित वेट्रिवेल यांनी विजय यांच्या घरी दाखल होत, त्यांना शुभेच्छा दिल्या होत्या.

# अभिनेत्री उर्वशी रौतेला जीजूची फॅन !



अभिनेत्री उर्वशी रौतेला यंदा आयपीएलमध्ये विराट कोहलीच्या रॉयल चॅलेंजर्स बंगळूरु संघाला पाठिंबा देत आहे. ती विराट कोहलीची फॅन आहे. अलीकडे, एका मुलाखतीत तर तिने विराटला लाडाने जीजू असे संबोधून आरसीबीच्या विजेतेपदासाठी शुभेच्छाही दिल्या. उर्वशी गमतीने म्हणाली, "विराट कोहली तर आमचे जीजू आहेत. आम्ही त्यांना पाठिंबा देणार आहोत. तुम्ही देणार आहात की नाही? मी क्रिकेटक्रेझी आहे. आयपीएलचे सगळे सामने पाहणे शक्य होत नाही. मात्र, प्लेऑफ सामने आणि फायनलची लढत आवर्जून पाहते." आरसीबी यंदाही ट्रॉफी जिंकण्यात यशस्वी ठरणार का, असा प्रश्न विचारला असता "माझी फेवरेट टीम यंदाही ट्रॉफी जिंकणार, याबद्दल माझ्या मनात कोतीही शंका नाही," असे उत्तर उर्वशीने दिले. आयपीएलच्या गुणतालिकेत गतविजेता आरसीबी तिसऱ्या स्थानावर आहे. संघाने आतापर्यंत खेळलेल्या दहापैकी सहा सामने जिंकले आहेत आणि चार सामन्यांमध्ये त्यांना पराभवाला सामोरे जावे लागले आहे. हा संघ सध्या गुणतालिकेत तिसऱ्या क्रमांकावर आहे. मुलाखतीदरम्यान उर्वशीने हेदेखील सांगितले की विराट कोहलीसोबत एक जाहिरात शूट करायची होती. पण ते दुर्दैवाने होऊ शकले नाही. ही जाहिरात मिळाली, त्यावेळी तर मी हचेतच होते. मात्र, शूट रद्द झाल्याने माझी मोठी इच्छा त्यामुळे अपुरी राहिली. वर्क फ्रंटबद्दल बोलायचे झाले तर, उर्वशी लवकरच वेब सिरीज 'इन्स्पेक्टर अविनाश'च्या दुसऱ्या सीझनमध्ये दिसणार आहे. यात ती रणदीप हुड्डाची पत्नी पूनम मिश्राच्या भूमिकेत दिसेल. येत्या १५ मेपासून ही वेब सिरीज 'इन्स्पेक्टर अविनाश टू' जिओ हॉटस्टारवर स्ट्रीम होईल. चित्रपटांबद्दल बोलायचे झाल्यास, उर्वशी लवकरच अक्षय कुमार अभिनीत 'वेलकम टू द जंगल' या चित्रपटात दिसणार आहे. हा चित्रपट २६ जून रोजी प्रदर्शित होईल ती शेवटची तेलुगू चित्रपट 'डाकू महाराज'मध्ये मोठ्या पडद्यावर दिसली होती.



# विचित्र अट अन्...

अभिनेत्री तनिषा मुखर्जी हिने आपल्या अभिनय कारकिर्दीतील एक धक्कादायक अनुभव शेअर केला आहे. नील न निकी या चित्रपटासाठी केलेल्या शारीरिक बदलांमुळे तिला गंभीर आरोग्य समस्यांना सामोरे जावे लागल्याचे तिने सांगितले. तनिषाच्या म्हणण्यानुसार, या चित्रपटासाठी तिची चाचणी स्वतः आदित्य चोप्रा यांनी घेतली होती. पहिल्या छायाचित्रणानंतर त्यांनी तिला स्पष्ट शब्दांत सांगितले होते की, "तू पडद्यावर अशी दिसू शकत नाहीस." चित्रपट मिळवण्यासाठी तनिषाने त्यांची अट मान्य केली आणि वजन कमी करण्यासाठी कडक आहार व कठोर व्यायाम सुरू केला. चित्रपटातील भूमिकेसाठी तनिषाने शरीरावर प्रचंड मेहनत घेतली. मात्र, हा अतिरेक तिच्याच अंगलट आला. कडक नियमांमुळे तिच्या शरीरातील संप्रेरकांचे संतुलन बिघडले. या अनुभवाबद्दल बोलताना ती म्हणाली, "अशा प्रकारचा कडक आहार आणि व्यायाम फार काळ पाळता येत नाही. मी ते पाळण्याचा प्रयत्न केला आणि त्याचे गंभीर परिणाम माझ्या शरीराला भोगावे लागले." 'नील अँड निक्की' प्रदर्शित झाल्यानंतर चित्रपटावर मोठ्या प्रमाणात टीका झाली होती. याबद्दल बोलताना तनिषाने स्वतःची भूमिका स्पष्ट केली. चित्रपटाच्या अपयशासाठी तिने स्वतःला जबाबदार धरले नाही. तिच्या मते, अभिनेता दिग्दर्शकाच्या सूचनेनुसार काम करतो. कॅमेरा, प्रकाशयोजना आणि तांत्रिक बाबींच्या मदतीने दृश्य प्रभावी बनवणे हे दिग्दर्शकाचे काम असते. प्रेक्षकांना चित्रपट का आवडला नाही हे समजून घेण्यासाठी तिने स्वतःचा चित्रपट पुन्हा तटस्थपणे पाहिला. टीका मनावर न घेता त्यातून शिकण्याचा प्रयत्न केल्याचेही तिने सांगितले. तनुजा यांची कन्या असलेल्या तनिषाला चित्रपटसृष्टीत कुटुंबातील इतर सदस्यांइतके यश मिळाले नाही. ती शेवटची 'लव्ह यू शंकर' या चित्रपटात दिसली होती. अनेक वर्षांनंतर तिने 'नील अँड निक्की'च्या निमित्ताने चकचकीत दुनियेमागील कठोर वास्तव समोर आणले आहे.

# दीपक पुनिया अंतिम फेरीत

## फ्रीस्टाईल वजन गटात अंतिम फेरी गाठली

**महाईन्यूज | गोंडा**

**अखिल भारतीय कुस्ती फेडरेशनतर्फे आयोजित करण्यात आलेल्या वरिष्ठांच्या खुल्या मानांकन राष्ट्रीय कुस्ती स्पर्धेत हरियाणाच्या मल्लांनी दमदार कामगिरी करत आपली ताकद पुन्हा एकदा सिद्ध केली आहे. विशेषतः ९२ किलो फ्रीस्टाईल वजन गटात आंतरराष्ट्रीय स्तरावर नाव कमावलेला हरियाणाचा स्टार मल्ल दीपक पुनिया याने शानदार विजय मिळवत अंतिम फेरीत प्रवेश केला आहे.**



उपांत्य फेरीत दीपक पुनियाची लढत त्याच्याच राज्यातील मल्ल राजा याच्याशी झाली. सुरुवातीपासूनच आक्रमक खेळ करत दीपकने प्रतिस्पर्ध्यावर वर्चस्व राखले. तांत्रिक कौशल्य, वेगवान हालचाली आणि अचूक डावपेचांच्या जोरावर त्याने राजाचा तब्बल ११-१ अशा मोठ्या फरकाने पराभव केला. या विजयामुळे दीपकने अंतिम फेरीतील आपले स्थान निश्चित केले असून आता त्याची अंतिम लढत हरियाणाच्याच वंश या मल्लासोबत रंगणार आहे. त्यामुळे अंतिम सामना अत्यंत रोमांचक होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

दरम्यान, १२५ किलो हेवीवेट फ्रीस्टाईल गटातही प्रेक्षकांना अत्यंत चुरशीची लढत पाहायला मिळाली. रोहित आणि अनिरुद्ध यांच्यात झालेला सामना शेवटच्या क्षणापर्यंत रंगतदार ठरला. दोन्ही मल्लांनी जोरदार प्रतिकार करत एकमेकांवर मात करण्याचा प्रयत्न केला. अखेर निर्णायक गुणाच्या जोरावर रोहितने अनिरुद्धचा पराभव करत पुढील फेरीत प्रवेश मिळवला. या सामन्याने उपस्थित प्रेक्षकांची उत्सुकता शिगेला पोहोचवली.




# पाकिस्तानला बांगलादेशने दिला दणका; मीरपूर कसोटीत शानदार विजय

**महाईन्यूज | बांगलादेश**

**पाचही दिवस सातत्याने चांगला खेळ करत बांगलादेशने मीरपूर कसोटीत पाकिस्तानला नमवण्याची किमया केली. दोन वर्षांपूर्वी बांगलादेशने पाकिस्तानला पाकिस्तानमध्ये हरवलं होतं. तशाच सातत्याने खेळ करत बांगलादेशने पाकिस्तानवर १०४ धावांनी दिमाखदार विजय मिळवला. या विजयासह बांगलादेशने दोन सामन्यांच्या मालिकेत १-० अशी आघाडी घेतली आहे.**



पाकिस्तानने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजीचा निर्णय घेतला. कर्णधार नझमुल हसन शंटोचं शतक आणि मोमिनुल हकच्या ९१ धावांच्या खेळीच्या बळावर बांगलादेशने ४१३ धावांची मजल मारली. शंटोने १२ चौकार आणि २ षटकारांसह १०१ धावा केल्या. मोमिनुलने १० चौकारांसह ९१ धावा केल्या. अनुभवी मुशफकीर रहीमने ७१ धावा करत या दोघांना चांगली साथ दिली. पाकिस्तानतर्फे मोहम्मद अब्बासने ५ विकेट्स पटकावल्या. शाहीन शहा आफ्रिदीने ३ विकेट्स घेत त्याला चांगली साथ दिली.

प्रत्युत्तरादाखल खेळताना पदार्पणवीर अझान अवैसच्या शानदार शतकाच्या जोरावर पाकिस्तानने ३८६ धावा केल्या. अझानने १४ चौकारांसह १०३ धावांची खेळी साकारली. अब्दुल्ला फझल (६०), सलमान अघा (५८) आणि मोहम्मद रिझवान (५९) यांनी अर्धशतकी खेळी केल्या. बांगलादेशतर्फे मेहदी हसन मिराझने ५ विकेट्स पटकावल्या. बांगलादेशने २७ धावांची अल्प आघाडी घेतली.

बांगलादेशने दुसऱ्या डावात २४० धावांवर डाव घोषित केला. कर्णधार शंटोने ७ चौकारांसह ८७ धावांची खेळी केली. मोमिनुल हकने ५६ धावा करत त्याला चांगली साथ दिली. चौथ्या दिवसाचा बराच वेळ पावसामुळे वाया गेला. त्यामुळे बांगलादेशने पाचव्या दिवशीही डाव सुरूच ठेवला. अडीच सत्र बाकी असताना बांगलादेशने पाकिस्तानला २६८ धावांचं लक्ष्य दिलं.

## खेळपट्टीवर फलंदाजांची भंबेरी

पाचव्या दिवशी आव्हानात्मक खेळपट्टीवर पाकिस्तानच्या फलंदाजांची भंबेरी उडाली. अब्दुल्ला फझलने ६६ धावांची एकाकी झुंज दिली. कर्णधार शान मसूद २ करून तंबूत परतला. अनुभवी सलमान अघा आणि सौद शकील मोठी खेळी करू शकले नाहीत. बांगलादेशतर्फे वेगवान गोलंदाज नाहिद राणाने भेदक मारा करत ५ विकेट्स पटकावल्या. तास्किन अहमद आणि ताजिअुल इस्लाम यांनी प्रत्येकी २ विकेट्स घेत नाहिदला चांगली साथ दिली. पाकिस्तानचा दुसरा डाव ५२.५ षटकात १६३ धावांतच आटोपला.

स्मार्ट PCMC SMART CITY
महाईन्यूज™
epaper.mahaenews.com
ePaper
। बुधवार ।
दि. 13 मे 2026 ।
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

# पीएमपी बसांचा प्रवास पुन्हा विस्कळीत...

**महाईन्यूज ।**
**पिंपरी- चिंचवड**

शहरातील दळणवळणाचे महत्त्वाचे साधन म्हणून ओळख असलेल्या 'पीएमपी'चा प्रवास सुरळीत होईल की नाही, याचा भरवसा सध्या तरी राहिला नाही. कारण, कमी झालेले बेकडाऊनचे प्रमाण दिवसेंदिवस पुन्हा वाढत आहे. त्यामुळे प्रवाशांना अर्ध्या वाटेत दुसऱ्या बसची वाट पाहावी लागते. एप्रिल - मे महिन्यांत बसचे बेकडाऊन होण्याचे प्रमाण वाढले आहे. यामुळे प्रवाशांना नाहक मनस्ताप सहन करण्याची वेळ आली आहे.

पुणे महानगर परिवहन महामंडळाकडून पुणे, पिंपरी-चिंचवड हद्दीत प्रवाशांना सेवा देण्यात येते. पीएमपीच्या अनेक बस शहरातील विविध भागांत पिंपरी, चिंचवड, निगडी या मार्गांवर धावतात. परंतु, यामध्ये जवळपास 50 पेक्षा जास्त बस दररोज बेकडाऊन होत आहेत. त्यामुळे प्रवाशांना निम्म्या वाटेत दुसऱ्या बसची वाट पाहावी लागते.

> "कर्तव्य पार पाडताना रस्त्यावर बस फेल झाल्यावर प्रवाशांना प्रवासादरम्यान अनेक अडचणी येतात. त्यामुळे कामगारांना वेळेत पोहोचण्यासाठी गैरसोय होते. अशावेळी दुसऱ्या बसमध्ये बसवण्यासाठी आमची रस्ता सुरक्षा पथक मदतीसाठी पुढे येऊन काम करते.
>
> **- केशव गडपल्लू, रस्ता सुरक्षापथक अधिकारी.**

शहरातील मार्गांवर धावणाऱ्या बसची देखभाल दुरुस्ती न केल्यामुळे त्याचे प्रमाण वाढत आहे. पीएमपी प्रशासनाकडून बेकडाऊन कमी करण्याचे वारंवार सांगण्यात येते. परंतु, याकडे दुर्लक्ष केले जात आहे. बेकडाऊनमुळे शहरातील प्रत्येक रस्त्यावर दररोज दोन चार पीएमपी बस बंद पडलेल्या दिसत आहेत. त्यामुळे प्रवाशांची डोकेदुखी वाढली आहे. एकीकडे तिकीट दर वाढविण्यात आले असून, सेवा देण्यात पीएमपी अपयशी ठरत आहे.

## ठेकेदारांच्या बसचे बेकडाऊन वाढले

पिंपरी, चिंचवड, निगडी, नेहरूनगर, संत तुकारामनगर, वल्लभनगर, मोरवाडी, पिंपरीगाव, भोसरी या मार्गांवर धावणाऱ्या एकूण खासगी बसपैकी दैनंदिन 30 टक्के खासगी ठेकेदारांच्या बस रस्त्यामध्ये बंद पडत आहेत. एप्रिल ते मे महिन्यात अनेक बसचे बेकडाऊन झाले आहे. त्यामुळे ठेकेदारांच्या बससेवेवर पुन्हा प्रश्नचिन्ह निर्माण झाला आहे. दिवसेंदिवस वाढणाऱ्या या बेकडाऊनमुळे प्रवासी मात्र हतबल झाले आहेत.






# पुनावळेतील शाळांचे आरक्षण खासगीकरण करण्याला सोसायटी फेडरेशनचा विरोध

## वाकडच्या धर्तीवर महापालिकेने शाळा उभारावी, स्थानिक नागरिकांना सुविधा द्यावी

**महाईन्यूज | पिंपरी- चिंचवड**

**पुनावळे येथील माध्यमिक शाळेसाठी आरक्षित असलेली सुमारे ०.९१ हेक्टर (अंदाजे २ एकर ९१ गुंठे) जमीन खासगी संस्थेला ३० वर्षांच्या दीर्घकालीन भाडेतत्त्वावर देण्याच्या प्रस्तावाविरोधात स्थानिक नागरिक, सहकारी गृहनिर्माण संस्था आणि सामाजिक संघटना आक्रमक झाल्या आहेत. या पार्श्वभूमीवर पिंपरी-चिंचवड सोसायटी फेडरेशनने मुख्यमंत्री कार्यालय, महापालिका आयुक्त, महापौर तसेच विभागीय आयुक्त कार्यालयाला सविस्तर निवेदन सादर केले आहे.**



निवेदनात स्पष्ट करण्यात आले आहे की, पुनावळे येथील सर्वे क्रमांक ३८ पै. व ४४ पै. मधील ही जमीन विकास आराखड्यात (DP) स्पष्टपणे 'माध्यमिक शाळा' म्हणून आरक्षित असून ती सध्या महापालिकेच्या ताब्यात आहे. अशा महत्त्वाच्या सार्वजनिक उपयोगाच्या जागेचा खासगीकरणाकडे कल जाणे हे नागरिकांच्या हिताविरोधी असल्याचा आक्षेप फेडरेशनने घेतला आहे.

सुमारे ७ कोटी रुपयांच्या नाममात्र मोबदल्यात ही उच्च बाजारमूल्य असलेली जमीन ३० वर्षांसाठी खासगी संस्थेला देणे हे आर्थिकदृष्ट्या चुकीचे व सार्वजनिक मालमत्तेच्या दृष्टीने नुकसानकारक आहे. अशा निर्णयामुळे भविष्यात महापालिकेच्या उत्पन्नावर आणि शिक्षण धोरणावर परिणाम होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे.

पुनावळे परिसरातील विद्यार्थ्यांचे भवितव्य, सार्वजनिक मालमत्तेचे संरक्षण आणि परवडणाऱ्या शिक्षणाचा हक्क लक्षात घेऊन महापालिकेने या प्रस्तावाचा पुनर्विचार करावा, अशी एकमुखी मागणी नागरिक व संस्थांकडून करण्यात येत आहे. निर्णय प्रक्रियेत पारदर्शकता राखूनच पुढील पावले उचलावीत, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

### फेडरेशनच्या चार मुख्य मागण्या

- पुनावळेतील शाळा आरक्षित जमीन खासगी संस्थेला देण्याचा प्रस्ताव तात्काळ रद्द करावा.
- महापालिकेने स्वतःच्या निधीतून आधुनिक माध्यमिक किंवा सीबीएसई शाळा उभारावी.
- संपूर्ण निविदा प्रक्रिया, आर्थिक मूल्यांकन आणि निर्णयाची पारदर्शक माहिती सार्वजनिक करावी.
- नागरिक, पालक व स्थानिक संस्थांसाठी तात्काळ सार्वजनिक सुनावणी (PUBLIC HEARING) आयोजित करावी.

> "पुनावळेतील माध्यमिक शाळेसाठी आरक्षित असलेली ही जमीन ही सार्वजनिक मालमत्ता आहे आणि ती थेट नागरिकांच्या भविष्यासाठी राखीव ठेवलेली आहे. अशा महत्त्वाच्या जागेचे खासगीकरण करून ती अल्प मोबदल्यात दीर्घकालीन भाडेतत्त्वावर देणे हे पूर्णपणे चुकीचे व अन्यायकारक आहे. परिसरात वेगाने वाढणारी लोकसंख्या पाहता येथे महापालिकेने स्वतःच्या निधीतून अत्याधुनिक व परवडणारी सीबीएसई शाळा उभारणे अत्यावश्यक आहे. वाकड येथे जसा आदर्श निर्माण झाला आहे, तसाच पुनावळे येथेही निर्माण करावा, हीच आमची ठाम मागणी आहे."
>
> - सचिन लोंढे, पिंपरी-चिंचवड सोसायटी फेडरेशन.

### 'वाकड मॉडेल'चा दाखला

महापालिकेने वाकड येथे उभारलेल्या अत्याधुनिक सीबीएसई शाळेचा उल्लेख करत, ती एक यशस्वी व आदर्श मॉडेल असल्याचे सांगितले आहे. त्याच धर्तीवर पुनावळे येथेही महापालिकेने स्वतःच्या निधीतून आधुनिक, दर्जेदार आणि सर्वसामान्यांना परवडणारी शाळा उभारावी, अशी ठाम मागणी करण्यात आली आहे. या संपूर्ण प्रस्तावाबाबत स्थानिक रहिवासी, गृहनिर्माण संस्था प्रतिनिधी किंवा लोकप्रतिनिधींशी कोणतीही चर्चा झालेली नाही, अशी तक्रार नागरिकांनी केली आहे. एवढ्या मोठ्या सार्वजनिक आरक्षणाच्या जागेचा निर्णय घेताना जनसहभाग व सार्वजनिक सुनावणी आवश्यक होती, मात्र ती प्रक्रिया राबविण्यात आली नसल्याबद्दल नाराजी व्यक्त करण्यात आली आहे.

# संत साई माध्यमिक विद्यालयाचा दहावीचा शंभर टक्के निकाल..!

**महाईन्यूज | पिंपरी- चिंचवड**

**भोसरी येथील संत साई माध्यमिक विद्यालय शाळेने दहावीच्या परीक्षेत यंदाही आपल्या उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम राखत घवघवीत यश संपादन केले आहे. शाळेच्या २५ व्या तुकडीने (BATCH) दहावीच्या परीक्षेत १०७ पैकी १०७ विद्यार्थी उत्तीर्ण होत शंभर टक्के निकालाची नोंद केली आहे. या उल्लेखनीय यशामुळे शाळेच्या शैक्षणिक गुणवत्तेची पुन्हा एकदा प्रचिती आली आहे.**




या यशामध्ये विद्यार्थ्यांनी विशेष प्राविण्य मिळवत शाळेचा नावलौकिक वाढविला आहे. गुणवंत विद्यार्थ्यांमध्ये अनुष्का पालवे – ९६.६०%, विनया वैष्णवी – ९६.४०%, समृद्धी पराड – ९४.६०% या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय कामगिरी केली आहे.

विशेष म्हणजे, या विद्यार्थ्यांनी बाहेरील कोणत्याही खासगी शिकवणीशिवाय केवळ स्वाध्याय आणि शाळेतील शिक्षकांच्या मार्गदर्शनावर विश्वास ठेवत हे यश मिळविले, ही बाब इतर विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरत आहे. विद्यार्थ्यांच्या मेहनतीला शिक्षकांचे नियोजनबद्ध अध्यापन आणि पालकांचे सातत्यपूर्ण सहकार्य यांची भक्कम साथ लाभल्याचेही यावेळी अधोरेखित करण्यात आले.

या यशामुळे पालक, शिक्षक व

**100%**

या संस्थेमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करताना शाळेचे संस्थापक श्री. शिवलिंग ढवळेश्वर सर, मुख्याध्यापिका सौ. सुनिता शिवलिंग ढवळेश्वर मॅडम तसेच शाळेच्या विश्वस्त पायल मॅडम यांनी विद्यार्थ्यांना पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या. यावेळी सर्व शिक्षकवृंद व पालकांचेही विशेष अभिनंदन करण्यात आले.

अथक परिश्रम, शिक्षकांचे योग्य मार्गदर्शन आणि पालकांचे मोलाचे सहकार्य यामुळेच हे यश शक्य झाले, असे मत विद्यार्थ्यांनी व्यक्त केले. संत साई माध्यमिक विद्यालयाच्या या उज्वल निकालामुळे परिसरात आनंदाचे वातावरण असून सर्वत्र यशस्वी विद्यार्थ्यांचे कौतुक होत आहे.

# यूकेतील ॲबरिस्टविथ विद्यापीठ आणि पीसीईटी यांच्यात शैक्षणिक सहकार्याला नवे बळ

## पुढील टप्प्यांतर्गत पीसीईटी ट्रस्टच्या कार्यालयात दोन्ही संस्थांच्या शिष्टमंडळाची महत्त्वपूर्ण बैठक

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**जागतिक दर्जाच्या शैक्षणिक संस्थांनी परस्पर सहकार्याच्या माध्यमातून विद्यार्थ्यांसह प्राध्यापकांसाठी नव्या संधी निर्माण करत उच्च शिक्षणाला परिवर्तनशील दिशा द्यावी, असे प्रतिपादन यूकेमधील ॲबरिस्टविथ विद्यापीठ येथील आंतरराष्ट्रीय विभागाचे सहयोगी प्र-कुलपती प्रा. नायजेल होल्ट यांनी केले. पिंपरी-चिंचवड एज्युकेशन ट्रस्ट (पीसीईटी) आणि ॲबरिस्टविथ विद्यापीठ यांच्यात निर्माण होत असलेले दृढ शैक्षणिक नाते भविष्यात दोन्ही संस्थांच्या विस्तारासाठी अत्यंत उपयुक्त ठरेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.**



पीसीईटी आणि यूकेमधील ॲबरिस्टविथ विद्यापीठ यांच्यात २०२५ मध्ये सामंजस्य करार (MoU) करण्यात आला होता. या कराराच्या पुढील टप्प्यांतर्गत पीसीईटी ट्रस्टच्या कार्यालयात दोन्ही संस्थांच्या शिष्टमंडळाची महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीस पीसीईटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्ष पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर तसेच कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई उपस्थित होते.

ॲबरिस्टविथ विद्यापीठाच्या वतीने आंतरराष्ट्रीय विभागाचे सहयोगी प्र-कुलपती प्रा. नायजेल होल्ट, प्रादेशिक व्यवस्थापक सामंथा वॅलिन, सल्लागार झफीर आलम यांनी सहभाग घेतला. पीसीईटीकडून ओ.एस.डी. डॉ. योगेश भावसार, डॉ. ऐश्वर्या गोपालकृष्णन, डॉ. निरुपमा कोचेरलाकोटा तसेच डिजिटल मार्केटिंग विभागाच्या शुभांगी रामटेके या बैठकीत सहभागी झाल्या होत्या. या बैठकीत दोन्ही संस्थांमधील भविष्यातील सहकार्याच्या विविध शक्यता सविस्तरपणे चर्चिला आल्या. उच्च शिक्षण, संशोधन, शेती, कला, संस्कृती, विद्यार्थी व प्राध्यापक विनिमय या क्षेत्रांमध्ये दीर्घकालीन आणि भक्कम भागीदारी उभारण्यावर विशेष भर देण्यात आला. या आंतरराष्ट्रीय शैक्षणिक सहकार्यामुळे पिंपरी-चिंचवडसह महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांना जागतिक दर्जाचे शिक्षण, संशोधन आणि आंतरराष्ट्रीय अनुभव मिळण्याचा मार्ग अधिक प्रशस्त होणार आहे.

> “ ॲबरिस्टविथ विद्यापीठ हे शैक्षणिक उत्कृष्टता, संशोधनातील भक्कम कामगिरी आणि आंतरराष्ट्रीय दर्जाच्या उच्च शिक्षण व संशोधन सुविधांसाठी जागतिक स्तरावर ओळखले जाते. या सामंजस्य कराराच्या माध्यमातून संयुक्त शैक्षणिक संशोधन, परदेशात उच्च शिक्षणाच्या संधी, दुहेरी पदवी अभ्यासक्रम, अल्पकालीन अभ्यासक्रम, समर स्कूल उपक्रम, विद्यार्थी-प्राध्यापक विनिमय, क्रेडिट ट्रान्सफर तसेच विद्यार्थी इंटर्नशिप यांसारखे विविध सहयोगी उपक्रम राबविले जाणार आहेत.
>
> - डॉ. गिरीश देसाई, कार्यकारी संचालक, पीसीईटी.

# पिंपरी चिंचवड क्रीडा क्षेत्रातही देशाला दिशा देणारे शहर ठरतेय; महापौर रवि लांडगे

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**


**पिंपरी चिंचवड हे केवळ औद्योगिक शहर नसून क्रीडा क्षेत्रातही देशाला दिशा देणारे शहर बनत आहे. आपल्या शहरातील खेळाडू आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताचा तिरंगा अभिमानाने फडकवत आहेत, ही प्रत्येक नागरिकासाठी प्रेरणादायी बाब आहे. जयदेव म्हमाणे यांच्यासारख्या खेळाडूंमुळे शहरातील युवा पिढीला नवी ऊर्जा मिळत आहे. अशा खेळाडूंच्या पाठीशी महापालिका कायम ठामपणे उभी राहील, असे प्रतिपादन महापौर रवि लांडगे यांनी केले.**




पिंपरी चिंचवड शहरातील क्रीडा क्षेत्रासाठी अभिमानाची बाब ठरलेल्या किंग मार्शल आर्ट्स संस्थेच्या विद्यार्थ्यांचा महापौर कार्यालयात महापौर रवि लांडगे यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे,सामाजिक कार्यकर्ते नामदेवराव जाधव उपस्थित होते. खेळाडूंना भविष्यात राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर अधिक संधी उपलब्ध व्हाव्यात, यासाठी आवश्यक ते सर्व सहकार्य करण्याचे आश्वासनदेखील यावेळी महापौर रवि लांडगे यांनी दिले.

उत्तर प्रदेशमधील सहारनपूर येथे नुकत्याच भारत-नेपाळ यांच्यात पार पडलेल्या इंडियन इंटरग्रील चॅम्पियन आंतरराष्ट्रीय स्पर्धेत भारताकडून खेळताना थेरगाव येथील चार खेळाडूंनी उल्लेखनीय कामगिरी करत शहराचा गौरव वाढविला. यामध्ये जयदेव म्हमाणे यांनी सुवर्णपदक पटकावत विशेष यश संपादन केले. यापूर्वीही त्यांनी तब्बल ११ सुवर्णपदके जिंकून आपल्या सातत्यपूर्ण कामगिरीची छाप उमटवली आहे. त्यांच्या उल्लेखनीय यशाची दखल भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीदेखील घेतली असून, हे संपूर्ण पिंपरी-चिंचवड शहरासाठी अभिमानाचे क्षण असल्याचेही यावेळी नमूद करण्यात आले.

यावेळी स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे म्हणाले, ‘खेळाडूंचे यश हे केवळ वैयक्तिक नसून संपूर्ण शहराचा सन्मान असतो. कठोर मेहनत, शिस्त आणि जिद्दीच्या जोरावर या विद्यार्थ्यांनी जागतिक स्तरावर पिंपरी चिंचवडचे नाव पोहोचवले आहे. भविष्यात अशा खेळाडूंना अधिक प्रोत्साहन व सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील,’ असे देखील त्यांनी सांगितले.


PRIYADARSHANI SCHOOL & JR COLLEGE
MOSHI
43 YEARS OF
NURTURING VALUES,
EXCELLENCE AND
TOMORROW'S LEADERS.
ADMISSIONS OPEN FOR AY 2026-27
Grade Nursery to Grade V
WHY CHOOSE PRIYADARSHANI SCHOOL?
43 Years of Excellence in Education | Advanced Robotics & Computer Labs
Experienced and Dedicated Faculty | Multiple Sports Grounds for All-Round Development
Proven 100% Results in Grade X | A Perfect Blend of Tradition and Innovation
+91 9890613333 | +91 9373073077
pgosm05@gmail.com
www.priyadarshanischoolmoshi.in